(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारात**

**नागपूर खंडपीठ : नागपूर**

**रिट याचिका (रि. या.) क्र. १५७७/२०२३**

(मेसर्स कोहली रोडलाइन्स, नागपूर **विरुद्ध** महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड, मुंबई)

---

| कार्यालयीन टिप्पणी, न्यायमंचाचे, उपस्थितीचे, न्यायालयाचे निर्देश संबंधी आदेश आणि प्रबंधकाचे आदेश यासंबंधीचे कार्यालयीन ज्ञापन | न्यायालय किंवा न्यायाधीशांचे आदेश |
|---|---|

---

श्री एस. पी. धर्माधिकारी, वरिष्ठ अधिवक्ता आणि कु. ए. एन. कावळे, याचिकाकर्त्याचे वकील

श्री.एम. पी. खजांची, उत्तरवादीचे वकील

श्री. ए. ए. नाईक, दिवाणी अर्ज रिट याचिका क्र. ८४६/२०२३ मध्ये अर्जदाराचे वकील

**न्यायमंच : न्यायमूर्ती ए. एस. चांदूरकर आणि न्यायमूर्ती एम. डब्ल्यू. चांदवानी**

**दिनांक : १६ मार्च, २०२३**

सदर रिट याचिकेत साउथ-ईस्ट कोलफिल्ड लिमिटेड (एस. ई. सी. एल.) च्या कुसमुंडा/गेवरा/दिपका या खाणींमधून उत्तरवादीच्या औष्णिक विद्युत केंद्रांना कच्च्या कोळशाचा पुरवठा करण्यासाठी रस्ते-सह-रेल्वे (आर सी आर) द्वारे वाहतुकीच्या बाबतीत उत्तरवादीने काढलेल्या निविदेला आव्हान देण्यात आले आहे.

२. उत्तरवादीच्या विद्वान वकिलांनी असा प्राथमिक आक्षेप घेतला आहे की, या न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या प्रादेशिक अधिकार क्षेत्रात कोणताही वाद कारण

उद्भवलेला नसल्यामुळे सदर रिट याचिकेवर सुनावणी करण्यासाठी या न्यायालयाला प्रादेशिक अधिकारिता नाही. तदनुसार, वरील प्राथमिक आक्षेपावर पक्षकारांच्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकून घेतले आहे.

३. ई-निविदा दस्तऐवजाचा संक्षिप्त संदर्भ आवश्यक आहे. उपरोक्त ई-निविदा सूचनापत्र दिनांक ११/०१/२०२३ रोजी चे आहे आणि प्रस्तावित काम म्हणजे साउथ-ईस्ट कोलफिल्ड लिमिटेड च्या कुसमुंडा/गेवरा/दिपका या खाणींमधून उत्तरवादीच्या औष्णिक ऊर्जा केंद्रांना रस्ते-सह-रेल्वे (आरसीआर) द्वारे पुरवठा करण्यासाठी कच्च्या कोळशाची वाहतूक करणे असे आहे. निविदा दस्तऐवजांची नोंदणी, विक्री तसेच त्याचे ऑनलाइन सादरीकरण आवश्यक आहे आणि बोलीपूर्व बैठक प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई येथील उत्तरवादीच्या कार्यालयात होणार आहे. परिणामी, ई-निविदा दस्तऐवज मुंबई येथील उत्तरवादीच्या मुख्य कार्यालयातून प्रकाशित करण्यात आला आहे आणि बोलीचे सादरीकरण देखील या मुख्य कार्यालयात ऑनलाइन केले जाणार आहे.

४. उत्तरवादीचे विद्वान वकील श्री.एम. पी. खजांची यांनी प्राथमिक आक्षेपांच्या समर्थनार्थ सादर केले की, संपूर्ण निविदा प्रक्रिया ऑनलाइन पार पाडली जाणार आहे आणि प्राप्त झालेल्या सर्व बोलींचा विचार मुंबई येथील मुख्य कार्यालयात केला जाणार आहे. मूल्यमापन तसेच उलट बोलीची प्रक्रिया जी देखील ऑनलाइन आयोजित केली जाणार आहे, ती मुंबई येथील मुख्य कार्यालयाद्वारे. या खंडपीठाच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात असलेल्या विविध औष्णिक विद्युत केंद्रांमध्ये कोळशाची वाहतूक केल्याने याचिकाकर्त्याला रिट याचिकेत विनंती केलेल्या कारणांवर निविदा दस्तऐवजाला आव्हान देण्यासाठी कारवाईचे कोणतेही कारण निर्माण होऊ शकत नाही. याचिकाकर्त्याचे कार्यालय नागपूर येथे आहे, केवळ ही वस्तुस्थिती गुणवत्तेच्या आधारे सुनावणीसाठी नागपूर येथे रिट याचिका दाखल करण्यास सहाय्यभूत होण्यासाठी पुरेशी नाही. त्याच्या निवेदनाच्या समर्थनार्थ विद्वान वकिलांनी **रिट याचिका क्र. ५४४१ /२०२१** [ बालाजी व्हेंचर्स प्रा. लि. विरुद्ध महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड आणि इतर ] मध्ये दिनांक २४/०१/२०२२ रोजी या

न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयावर तसेच या न्यायालयाच्या दिनांक २४/०१/२०२२ रोजीच्या न्यायनिर्णयाला आव्हान देण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या **अपीलसाठी विशेष परवानगी याचिका (अनेक) क्र. १६१६/२०२२ आणि १६७३/२०२२** मध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयावर विश्वास दर्शविला आहे. केवळ नागपूरहुन निविदाची कागदपत्रे ऑनलाईन सादर केल्याने याचिकाकर्त्याला या खंडपीठात रिट दाखल करण्याकरिता प्रादेशिक अधिकारिता मिळत नाही. म्हणून असे सादर करण्यात येते की, वाद कारणाचा कोणताही भाग नागपूर येथे उद्भवत नसल्यामुळे, या खंडपीठाद्वारे सदर रिट याचिका गुणवत्तेवर विचारात घेण्यास पात्र नाही.

५. याचिकाकर्त्याचे विद्वान वरिष्ठ अधिवक्ता श्री एस. पी. धर्माधिकारी यांनी वरील निवेदनास विरोध केला आणि असे सादर केले की, वाद कारणाचा काही भाग जर नागपूर खंडपीठाच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात उद्भवल्याचे दर्शविले आहे तर रिट याचिका गुणवत्तेवर विचारात घेतली गेली पाहिजे. ई-निविदा दस्तऐवजाच्या विविध खंडाच्या आणि विशेषत: खंड १. १, १.२, १. १४, १. १७, १. २७, १. ३५ तसेच बोली दस्तऐवजाच्या परिशिष्ट ४ चा संदर्भ असे सांगण्यासाठी देण्यात आला होता की, निविदा ऑनलाइन सादर करायच्या होत्या हे तथ्य असूनही, याचिकाकर्त्याने ई-निविदा संबंधी कागदपत्रे नागपूर येथे डाऊनलोड केली होती आणि ती नागपुरातूनच सादर केली गेली होती, परिणामी वाद कारणाचा काही भाग नागपूर येथे उद्भवतो. केवळ बोलीचे दस्तऐवज मुंबई येथील उत्तरवादीच्या मुख्य कार्यालयात ऑनलाइन सादर करायचे असल्यामुळे या खंडपीठाचे प्रादेशिक अधिकारक्षेत्र काढून टाकले जाणार नाही, विशेषतः या तथ्याच्या दृष्टीने की, कच्च्या कोळशाची वाहतूक उत्तरवादीच्या विविध औष्णिक विद्युत केंद्रांमध्ये केली जाणार होती, ज्यापैकी सुमारे चार औष्णिक विद्युत केंद्रे या खंडपीठाच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात आहे. पुढे असे सादर करण्यात आले की, या अगोदर याचिकाकर्ता **रिट याचिका क्र. ११३४/२०२३** (मेसर्स कोहली रोडलाइन्स, नागपूर - विरुद्ध- महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड, मुंबई) मध्ये या न्यायालयात आला होता कारण याचिकाकर्त्याला ई-निविदा दस्तऐवज अपलोड करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी अपलोड करण्यापासून प्रतिबंधित करण्यात आले होते.

या न्यायालयाने दिनांक २०/०२/२०२३ रोजी सदर रिट याचिका विचारार्थ स्वीकारली होती आणि  याचिकाकर्त्याला त्याचे ई-निविदा दस्तऐवज ऑफलाइन सादर करण्याची परवानगी देणारे अंतरिम आदेश पारित केले होते. विद्वान वरिष्ठ वकिलांनी  त्या संदर्भात शांती देवी उर्फ शांती मिश्रा -विरुद्ध- युनियन ऑफ इंडिया आणि इतर **[(२०२०) १० एस. सी. सी. ७६६]** आणि अल्केमिस्ट लिमिटेड आणि इतर - विरुद्ध - स्टेट बँक ऑफ सिक्कीम  आणि इतर **[(२००७) ११ एस. सी. सी. ३३५]**  या प्रकरणामध्ये दिलेल्या निर्णयावर विश्वास दर्शविला. त्यांनी *बालाजी व्हेंचर प्रायव्हेट लिमिटेड* (*उपरोल्लेखित*) मध्ये या न्यायालयाने दिलेल्या न्यायनिर्णयात  फरक करण्याचा प्रयत्न सुद्धा असे सांगण्यासाठी केला की, जेव्हा सदर रिट याचिकेवर सुनावणी झाली,  त्यावेळी आता उपस्थित केलेले कायदेशीर मुद्दे उपस्थित करण्यात आले  नव्हते.  म्हणून असे सादर करण्यात आले की, वाद कारणाचा एक भाग नागपूर खंडपीठाच्या प्रादेशिक कार्यक्षेत्रात उद्भवल्यामुळे सदर रिट याचिका गुणवत्तेवर विचारात घेण्यास पात्र होती.

६.	सध्याच्या कार्यवाहीमध्ये हस्तक्षेप करण्यासाठी दाखल करण्यात आलेले दिवाणी अर्ज (डब्ल्यू) क्र. ८४६/२०२३ मध्ये अर्जदाराचे विद्वान वकील  श्री. अक्षय नाईक यांनी उत्तरवादीने घेतलेल्या प्राथमिक आक्षेपाला समर्थन दिले आणि  गोवा राज्य - विरुद्ध - समेट  ऑनलाइन ट्रेड सोल्यूशन्स (पी) लिमिटेड आणि इतर, **दिवाणी अपील  क्र. १७००/२०२३ आणि इतर संबंधित दिवाणी अपील** मध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४/०३/२०२३ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयाकडे आमचे लक्ष वेधले. असे सांगण्यात आले की, वादकारणाचा  भाग कोणत्या पद्धतीने उद्भवला हे दर्शविण्यासाठी रिट याचिकेत कोणत्याही युक्तीवादाच्या अनुपस्थितीत, या खंडपीठाच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात  वाद कारणाचा भाग उद्भवला असा आग्रह करण्यास कोणताही आधार नाही.

७.	प्राथमिक आक्षेपावर पक्षकारांच्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि संबंधित निवेदनावर  योग्य विचार करून, आमचे  असे  मत आहे की, या न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात वाद कारणाचा कोणताही भाग

उद्भवत   नसल्यामुळे, सदर  रिट याचिका गुणवत्तेच्या आधारे विचारार्थ घेण्यायोग्य नाही.

सर्वप्रथम  हे लक्षात घेण्यासारखे आहे की,  याचिकाकर्त्यासाठी संपूर्ण रिट याचिकेत या न्यायालयाच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्राला  आवाहन करण्यासाठी  रिट याचिकेत मागितलेल्या दिलासाचे आधार दर्शविणारे कोणतेही युक्तिवाद नाही. रिट याचिकेत मांडलेली कारणे  अभिकथित निरंकुश  पद्धतीशी संबंधित आहे,  ज्याद्वारे उत्तरवादीने, बोली आमंत्रित करणाऱ्या  सूचनापत्रामधील  अटींच्या विरुद्ध पद्धतीने; विशेषकरून  बोली सादर करण्याची दिनांक ०३/०३/२०२३ ते ०९/०३/२०२३ पर्यंत वाढवून निविदा प्रक्रिया पार पाडली. सदर रिट याचिका नागपूर खंडपीठाच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात उद्भवलेल्या वाद कारणाच्या  एका पैलूवर देखील पूर्णपणे मूक  आहे. अर्जदाराच्या विद्वान वकिलाने रास्तपणे, माननीय सर्वोच्च न्यायालयाने   गोवा  राज्याच्या (उपरोल्लेखित) प्रकरणामध्ये  अलीकडे दिलेल्या निर्णयाकडे आमचे लक्ष वेधले, ज्यामध्ये वाद कारण कोणत्या पद्धतीने उद्भवतो हे दर्शविण्यासाठी वादग्रस्त तथ्यांच्या महत्वाचा पैलूवर अधिक भार दिले आहे. त्या संदर्भात कोणत्याही युक्तिवादाच्या अनुपस्थितीत, याचिकाकर्त्याचे कार्यालय नागपूर येथे असल्याने, वाद कारणाचा  एक भाग नागपूर येथे उद्भवला या या आधारावर तेच अधिकारक्षेत्र आवाहन करण्यासाठी पुरेसे आहे, असे गृहीत धरून या न्यायालयाला पुढे जाणे अनुज्ञेय होणार नाही. या मुलभूत युक्तिवादांच्या अनुपस्थितीमुळे याचिकाकर्त्याला नागपूर येथे वाद कारणाचा एक भाग उद्भवला आहे या त्याच्या युक्तिवादाचा विचार करण्यापासून परावृत्त करते.

८.  ई-निविदा दस्तऐवजाचे अवलोकन  असे सुचविते की, ते उत्तरवादीने त्याच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयाच्या माध्यमातून प्रकाशित केले आहे. संभाव्य बोलीदारांच्या नोंदणीपासून सुरू होणारे सर्व टप्पे, निविदा दस्तऐवजाची विक्री,  बोली पूर्व बैठक आयोजित करणे आणि त्यानंतर आर्थिक बोली सुरू होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया मुंबई येथील मुख्य कार्यालयात पार पाडली  जाणार आहे. हे खरे आहे की ई-निविदा दस्तऐवज सादर करणे आणि त्या संदर्भात रक्कम भरणे यासारख्या काही कृती ऑनलाइन करण्याची परवानगी आहे. याचिकाकर्ता ज्याचे  कार्यालय नागपूर येथे आहे, त्याने  ई-निविदा दस्तऐवज नागपूर येथे डाउनलोड केले आहे आणि त्यानंतर नागपूरहून ई-निविदा दस्तऐवज अपलोड करण्याची

मागणी केली आहे, पण नागपूर येथे वाद कारणाचा कोणताही भाग उद्भवलेला नसताना नागपूरला प्रादेशिक अधिकारक्षेत्र म्हणून बहाल करण्यास हे कारण पुरेसे नाही. खरे तर, याचिकाकर्ते संपूर्ण निविदा दस्तऐवज अपलोड करू शकले नाहीत आणि म्हणून रिट याचिका क्र. ११३४/२०२३ दाखल केली आणि दिनांक २०/०२/२०२३ रोजीच्या अंतरिम आदेशाद्वारे बोलीची कागदपत्रे ऑफलाईन सादर करण्याची परवानगी देण्यात आली होती. रिट याचिकेच्या परिच्छेद १० मध्ये अशी विनंती करण्यात आली आहे की, त्या अनुषंगाने, याचिकाकर्त्याने उत्तरवादीच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयात आपली बोली ऑफलाइन सादर केली. त्यामुळे प्रत्यक्षात याचिकाकर्त्याची बोलीची कागदपत्रेही मुंबईत सादर करण्यात आली होती, यावरून नागपुरात कोणतीही घटना घडली नसल्याचे दिसून येते. पुढे, याचिकाकर्ता ऑनलाइन बोली सादर करण्यासाठी मुदतवाढ केल्यामुळे व्यथित आहे, जे इतर बोलीदारांच्या बाजूने केल्याचा आरोप आहे. मुंबई येथील मुख्य कार्यालयात दिनांक ०३/०३/२०२३ पासून ०९/०३/२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या खंडपीठाच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात असलेल्या काही औष्णिक ऊर्जा केंद्रांवर कच्च्या कोळशाची वाहतूक हे सुद्धा सदर बोली पूर्व टप्प्याशी संबंधित घटक नाही. विचाराधीन मुद्दा निविदा सादर करण्यासाठी मुदतवाढीचा आहे, जो निविदा मागविणाऱ्या सूचनापत्रामधील अटींच्या विरुद्ध असल्याचा याचिकाकर्त्याने आरोप केला आहे. *बालाजी व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड* (उपरोल्लेखित) च्या प्रकरणामध्ये या न्यायालयाने निरीक्षण नोंदविल्याप्रमाणे, केवळ तीच वस्तुस्थिती आहे ज्याचा या यादीशी संबंध किंवा प्रासंगिकता आहे ज्यामुळे वादकारण निर्माण होतो जे **[(२००२) १ एस.सी.सी. ५६७]** मध्ये प्रकाशित *युनियन ऑफ इंडिया- विरुद्ध- अदानी एक्सपोर्ट्स लिमिटेड* मध्ये दिलेल्या निर्णयाशी संबंधित आहे. त्यामुळे रिट याचिकेचे अवलोकन केल्यावर आणि संपूर्ण निविदा दस्तऐवज वाचल्यावर आम्हाला असे आढळले आहे की रिट याचिकेत दाद मागितल्याप्रमाणे विचारात घेण्यासाठी वाद कारणाचा कोणताही भाग नागपूर खंडपीठाच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात उद्भवला नाही.

९. जरी याचिकाकर्त्याचा युक्तिवाद स्वीकार केला की, वाद कारणाचा काही भाग या न्यायालयाच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रात उद्भवला आहे, तरी ' सोयीस्कर मंच' या

सिद्धांतावर आम्ही सदर रिट याचिका विचारार्थ स्वीकारण्यास इच्छुक नाही. निविदा दस्तऐवजाचे मूल्यमापन मुंबईत होणार आहे, जिथून निविदा सुचनापत्र जारी करण्यात आले आहे आणि ही वस्तुस्थिती असे मानण्यासाठी पुरेशी आहे की, जर रिट याचिका मुख्य न्यायाधीशांचे खंडपीठ ज्यांच्या प्रादेशिक अधिकारक्षेत्रांतर्गत उत्तरवादीचे मुख्य कार्यालय आहे, तेथे विचारार्थ स्वीकारली गेली तर ते अधिक सोयीचे होईल.

१०. उपरोक्त कारणास्तव, आम्ही उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात वादाचा कारण किंवा त्याचा एखादा भाग सुद्धा उद्भवत नसल्यामुळे रिट याचिकेवर सुनावणी करण्यास नकार देतो. त्यामुळे रिट याचिका गुणवत्तेवर विचारात घेतली जात नाही आणि ती उपरोक्त कारणांसाठी निकाली काढली जाते. कायद्यानुसार या रिट याचिकेत उपस्थित केलेल्या तक्रारी मांडण्यासाठी याचिकाकर्ता प्रादेशिक अधिकारक्षेत्र असलेल्या न्यायालयात जाण्यास स्वतंत्र आहे, हे सांगण्याची गरज नाही. रिट याचिकेत उपस्थित केलेले मुद्दे खुले ठेवले जातात. तद्नुसार आदेश पारित. खर्च काही नाही.

**(न्यायमूर्ती एम. डब्ल्यू. चांदवानी)** **(न्यायमूर्ती ए. एस. चांदूरकर)**

<u>अस्वीकरण</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करिता वैध मानला जाईल.

X – X – X - X